# 'चेअर ऑफ एक्सलन्स'द्वारे लष्कराचा इतिहास जनसामान्यांपर्यंत

## संरक्षण मंत्रालय, विद्यापीठात सामंजस्य करार

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** संरक्षण मंत्रालयाने उपलब्ध करून दिलेल्या दोन कोटींच्या निधीतून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात चेअर ऑफ एक्सलन्स निर्माण करण्यात येणार आहे. या चेअर ऑफ एक्सलन्सद्वारे लष्कराविषयीची, लष्कराच्या इतिहासाविषयीची माहिती, संशोधन, पुस्तके जनसामान्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहेत.

विद्यापीठ आणि संरक्षण मंत्रालय यांच्यात शुक्रवारी चेअर ऑफ एक्सलन्ससाठीचा सामंजस्य करार करण्यात आला. संरक्षण मंत्रालयाचे सहसचिव मयांक तिवारी, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी करारावर स्वाक्षरी केली. लष्करी प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपालकृष्ण, लष्करी इतिहास विभागाचे डॉ. ए. के. मिश्रा, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे आदी या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात दोन कोटींचा धनादेश प्रतिकात्मक रुपात मंत्रालयाकडून विद्यापीठाला देण्यात आला.

> **लष्कराविषयीची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मंत्रालयाच्या प्रयत्नांचा चेअर ऑफ एक्सलन्स हा एक भाग आहे. 'चेअर ऑफ एक्सलेन्स'साठी संपूर्ण भारतातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड करण्यामागे विद्यापीठाकडे असणारी बौद्धिक संपदा हे महत्त्वाचे कारण आहे. या चेअर ऑफ एक्सलन्ससाठी कुलगुरू आणि विभागप्रमुख यांनी बराच उत्साह दाखवला. भविष्यात असे अनेक उपक्रम विद्यापीठासोबत राबवण्यात येतील.**
>
> – **मयांक तिवारी**, सहसचिव, संरक्षण मंत्रालय

डॉ. करमळकर म्हणाले, की भारताचा वसाहतपूर्व काळापासूनचा लष्करी इतिहास आजच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न चेअर ऑफ एक्सन्सद्वारे केला जाईल. त्यासाठी पुढील तीन वर्षात विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन साहित्य, पुस्तके, व्याख्याने आदी उपक्रम राबवले जातील. या चेअर ऑफ एक्सलन्सशिवाय मराठा साम्राज्याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. चेअर ऑफ एक्सलेन्सच्या माध्यमातून सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आतापर्यंत विभागाला भूसेना, वायू सेना आणि संरक्षण मंत्रालय अशा तीन 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाल्या असून आता नौदलाकडेही प्रस्ताव पाठवण्यात आला आहे, असे डॉ. खरे यांनी सांगितले.

लोकसत्ता
Sat, 04 September 2021
https://epaper.loksatta.com/c/62904970

लोकमत

# बौद्धिक संपदेमुळे 'चेअर ऑफ एक्सलन्स'चा बहुमान

## संरक्षण मंत्रालयाचे सचिव मयांक तिवारी : विद्यापीठाचा संरक्षण मंत्रालयासोबत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : संपूर्ण भारतातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी निवड करण्याचे महत्त्वाचे कारण हे विद्यापीठाकडे असणारी बौद्धिक संपदा आहे, असे मत संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मयांक तिवारी यांनी व्यक्त केले.

भारत सरकारचे संरक्षण मंत्रालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग यांच्यात 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी सामंजस्य करार झाला. या सामंजस्य करारावर शुक्रवारी (दि. ३) विद्यापीठच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

या वेळी दोन कोटी रुपयांचा धनादेश संरक्षण मंत्रालयाकडून विद्यापीठाला प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मयांक तिवारी बोलत होते. या कार्यक्रमाला लष्करी प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपाल कृष्णा, लष्करी इतिहास विभागाचे डॉ. ए. के. मिश्रा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संरक्षण व सामारिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे व संरक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मयांक तिवारी म्हणाले, लष्कराविषयीची माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी या हेतूने आम्ही हा करार केला आहे. सद्यस्थितीवर जिथे मोठ्या प्रमाणात संशोधन केले जाते, अशा विद्यापीठाला आम्ही हे काम सोपवले आहे. भविष्यात असे अनेक कार्यक्रम विद्यापीठासोबत राबविण्यात येतील.

कुलगुरू नितीन करमरकर म्हणाले, या चेअर ऑफ एक्सलन्समुळे भारतीय लष्कराचा इतिहास उलगडणार आहे. मराठा सैनिकांच्या देदीप्यमान इतिहासावर सध्या संशोधन सुरू आहे. डॉ. विजय खरे यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. एन. एस. उमराणी यांनी आभार मानले.



भारत सरकारचे संरक्षण मंत्रालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग यांच्यात 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी सामंजस्य करार झाला. या वेळी डॉ. नितीन करमळकर, एस. गोपाल कृष्णा आदी उपस्थित होते.

भारताचा वसाहतपूर्व काळापासूनचा लष्करी इतिहास आजच्या तरुण पिढीला माहीत व्हावा, यासाठी या कराराच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा लष्करी इतिहास विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन साहित्य, पुस्तके, व्याख्यानांद्वारे लोकांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. **- प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाला या 'चेअर ऑफ एक्सलेन्स' च्या माध्यमातून सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आतापर्यंत विभागाला भूसेना, वायूसेना आणि संरक्षण मंत्रालय अशा तीन 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाल्या असून आता नौदलाकडेही आपण प्रस्ताव पाठविला आहे. **- डॉ. विजय खरे, विभागप्रमुख, संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

सामना

# विद्यापीठाकडील बौद्धिक संपदेमुळे 'चेअर ऑफ एक्सलेन्स'चा बहुमान - मयांक तिवारी

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) - संपूर्ण हिंदुस्थानातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी निवड करण्याचं महत्त्वाचं कारण हे विद्यापीठाकडे असणारी बौद्धिक संपदा आहे, असे मत संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मयांक तिवारी यांनी व्यक्त केले.

केंद्र सरकारचे संरक्षण मंत्रालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग यांच्यात 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी सामंजस्य करार झाला. या सामंजस्य करारावर ३ सप्टेंबर २०२१ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी दोन कोटी रुपयांचा चेकही प्रातिनिधिक स्वरूपात संरक्षण मंत्रालयाकडून प्रदान करण्यात आला. त्यावेळी मयांक तिवारी बोलत होते. या कार्यक्रमाला लष्करी प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपाल कृष्णा, लष्करी इतिहास विभागाचे डॉ. ए. के. मिश्रा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संरक्षण व सामारिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे व संरक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मयांक तिवारी म्हणाले, लष्कराविषयीची माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी या हेतूने आम्ही हा करार केला आहे. सद्यस्थितीवर जिथे मोठ्या प्रमाणात संशोधन केलं जातं, अशा विद्यापीठाला आम्ही हे काम सोपवले असून, भविष्यात असे अनेक कार्यक्रम विद्यापीठासोबत राबविण्यात येतील.

विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाला या 'चेअर ऑफ एक्सलेन्स' च्या माध्यमातून सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आतापर्यंत विभागाला भूसेना, वायू सेना आणि संरक्षण मंत्रालय अशा तीन 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाल्या असून, आता नौदलाकडेही आपण प्रस्ताव पाठविला असल्याचे डॉ. विजय खरे यांनी सांगितले.



" हिंदुस्थानचा वसाहतपूर्व काळापासूनचा लष्करी इतिहास आजच्या तरुण पिढीला माहीत व्हावा, यासाठी या कराराच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा लष्करी इतिहास विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन साहित्य, पुस्तके, व्याख्यानांद्वारे लोकांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

**- प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू.**

**दिव्य मराठी विशेष** • पुणे विद्यापीठ आणि संरक्षण मंत्रालयात सामंजस्य करार

# पुणे विद्यापीठाला 'चेअर ऑफ एक्सलन्स'

प्रतिनिधी | पुणे

संपूर्ण भारतातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी निवड करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यापीठाकडे असणारी बौद्धिक संपदा आहे, असे मत संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मयांक तिवारी यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

भारत सरकारचे संरक्षण मंत्रालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात 'चेअर ऑफ एक्सलेन्स' साठी सामंजस्य करार झाला. या सामंजस्य करारावर ३ सप्टेंबर २०२१ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या वेळी दोन कोटी रुपयांचा चेकही प्रातिनिधिक स्वरूपात संरक्षण मंत्रालयाकडून प्रदान करण्यात आला. त्यावेळी मयांक तिवारी बोलत होते. या कार्यक्रमाला लष्करी प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपाल कृष्णा, लष्करी इतिहास विभागाचे डॉ.ए.के. मिश्रा, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे व संरक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मयांक तिवारी म्हणाले, लष्कराविषयीची माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी या हेतूने आम्ही हा करार केला आहे.

## लष्करी इतिहास माहिती व्हावा

*भारताचा वसाहतपूर्व काळापासूनचा लष्करी इतिहास आजच्या तरुण पिढीला माहीत व्हावा यासाठी या कराराच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा लष्करी इतिहास विद्यापयपीठाच्या माध्यमातून संशोधन साहित्य, पुस्तके, व्याख्यानांद्वारे लोकांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.*

**- प्रा.डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त

*विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाला या 'चेअर ऑफ एक्सलेन्स' च्या माध्यमातून सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आतापर्यंत विभागाला भूसेना, वायू सेना आणि संरक्षण मंत्रालय अशा तीन 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाला आहे.*

**- डॉ. विजय खरे,** विभागप्रमुख संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# लष्करी इतिहास विद्यापीठामार्फत प्राप्त होणार

## भारतातून पुणे विद्यापीठाची 'चेअर ऑफ एक्सलेन्स'साठी निवड

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** संपूर्ण भारतातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'चेअर ऑफ एक्सलेन्स'साठी निवड करण्याचे महत्त्वाचे कारण हे विद्यापीठाकडे असणारी बौद्धिक संपदा आहे. याद्वारे लष्करी इतिहास सर्वांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने विद्यापीठाबरोबर करार करण्यात आल्याचे संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मयांक तिवारी यांनी व्यक्त केले.

भारत सरकारचे संरक्षण मंत्रालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग यांच्यात 'चेअर ऑफ एक्सलेन्स'साठी सामंजस्य करार झाला. या करारावर शुक्रवारी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी २ कोटी रुपयांचा धनादेशही प्रातिनिधीक स्वरूपात संरक्षण मंत्रालयाकडून प्रदान करण्यात आला. त्यावेळी मयांक तिवारी बोलत होते. यावेळी लष्करी प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपाल कृष्णा, लष्करी इतिहास विभागाचे डॉ. ए. के. मिश्रा, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय खरे आदी उपस्थित होते.



**लष्करी इतिहास सर्वांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने विद्यापीठाबरोबर करार**

> भारताचा वसाहतपूर्व काळापासूनचा लष्करी इतिहास आजच्या तरुण पिढीला माहीत व्हावा यासाठी या कराराच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा लष्करी इतिहास विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन साहित्य, पुस्तके, व्याख्यानांद्वारे लोकांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे.
>
> **- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू

मयांक तिवारी म्हणाले, लष्कराविषयीची माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी या हेतूने आम्ही हा करार केला आहे. सद्य:स्थितीवर जिथे मोठ्या प्रमाणात संशोधन केले जाते अशा विद्यापीठाला आम्ही हे काम सोपवले असून भविष्यात असे अनेक कार्यक्रम विद्यापीठासोबत राबविण्यात येतील.

विभागप्रमुख डॉ. विजय खरे म्हणाले, विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाला या 'चेअर ऑफ एक्सलेन्स'च्या माध्यमातून सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी २ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आतापर्यंत भू-सेना, वायू सेना आणि संरक्षण मंत्रालय अशा तीन विभागाला 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाले आहेत.

लोकमत

# विद्यापीठाच्या संरक्षण, सामरिकशास्त्र विभागाचा केंद्राकडून सन्मान

## दोन कोटी रुपयांची आर्थिक तरतूद: चार 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळवणारा भारतातील एकमेव विभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व समरिकशास्त्र विभागात भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. ही "चेअर ऑफ एक्सलेन्स" मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे.

> संरक्षण व समरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे. ज्यामध्ये भू सेना, वायू सेना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने "चेअर ऑफ एक्सेलेन्स" ची स्थापना करण्यात आली आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा आमचा मानस असून यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.
>
> **- डॉ. विजय खरे, विभाग प्रमुख, संरक्षण व समरिकशास्त्र विभाग**

> संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला "चेअर ऑफ एक्सलेन्स" मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.
>
> **- प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी. तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार व्हावा यासाठी भारतभरातील विद्यापीठाकडून प्रस्ताव मागविण्यात आले. यासाठी १०० विद्यापीठाकडून अर्ज करण्यात आले. या सर्व प्रस्तावातून संरक्षण व समरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता पुणे विद्यापीठात "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे. याआधी संरक्षण व समरिकशास्त्र विभागमध्ये भारतीय भुसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये "मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग" यांच्या नावे "चेअर ऑफ एक्सेलेन्स" मिळाले आहे.

कुलगुरू प्रा.डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

सकाळ

# संरक्षण मंत्रालय, पुणे विद्यापीठ एकत्र

## लष्करी इतिहास संशोधनासाठी उपक्रम; १०० विद्यापीठांतून निवड

**पुणे, ता. ३ :** सैन्याच्या इतिहासाबरोबरच पारतंत्र्यापूर्वीच्या लष्करी इतिहासावर संशोधन करण्यासाठी 'चेअर ऑफ एक्सलन्स'ची विद्यापीठात स्थापना करण्यात आली आहे. देशभरातील १०० विद्यापीठांपैकी संरक्षण मंत्रालयाने आमची निवड करणे निश्चितच गौरवपूर्ण आहे. त्याहीपेक्षा देशाच्या लष्करी इतिहासाच्या लेखनाची संधी मिळणे अभिमानास्पद आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केली.

संरक्षण मंत्रालय आणि विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये शुक्रवारी सामंजस्य करार झाला. संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मयांक तिवारी उपस्थित होते. मंत्रालयाचे प्रशिक्षण विभाग संचालक एस. गोपालकृष्ण, लष्करी इतिहास विभागाचे डॉ. ए. के. मिश्रा, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. विजय खरे उपस्थित होते.

### असा आहे उपक्रम

- देशाच्या प्राचीन ते आजवरच्या लष्करी इतिहासावर संशोधन करणार
- शोधनिबंध प्रकाशित करणे, परिषदा, चर्चासत्रे आदींचे आयोजन करणे
- ऐतिहासिक तथ्यांचे संग्रह करणे, कागदपत्रांचे संकलन आणि संवर्धन
- सैन्याच्या संरक्षण आणि सामरिक धोरणासंबंधी जागृती करणे

**देशाच्या सैन्याचा अभिमानास्पद इतिहास, परंपरांची आणि शौर्याची माहिती येणाऱ्या पिढीला होणे गरजेचे आहे. विद्यापीठातील या चेअर ऑफ एक्सलेन्सच्या माध्यमातून सैन्याने केलेल्या कामाची माहिती सर्वसामान्यांना होईल.**
– **मयांक तिवारी,** संयुक्त सचिव, संरक्षण मंत्रालय

### आकडे बोलतात

**२ कोटी**
मिळालेला निधी

**३ वर्षे**
सामंजस्य कराराची वर्षे

**दर ३ महिन्यांनी**
आढावा घेणार

**१००**
विद्यापीठांतून निवड